महाराष्ट्र शासन

क्र. प्रआयो-2019/प्र.क्र. 256/यो-10,
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, 25 मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-400 001
दि.२५ जानेवारी, 2019.

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

**विषय:- ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनार्थ केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करावयाच्या धोरणांतर्गत संगणकीय प्रणालीवरील नोंदीबाबत करावयाची कार्यवाही.**

संदर्भ:- 1. शासन निर्णय क्र. प्रआयो-2018/प्र.क्र. 348/यो-10, दि. 16.02.2018.
2. शासन निर्णय क्र. प्रआयो-2018/प्र.क्र. 256/यो-10, दि. 20.8.2018.
3. शासनाचे सम क्रमांकाचे दि. 05.11.2018 चे पत्र.
4. शासनाचे सम क्रमांकाचे दि. 19.11.2018 चे पत्र.
5. शासनाचे सम क्रमांकाचे दि. 24.12.2018 चे पत्र.

ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनार्थ केलेली अतिक्रमणे नियमानुकुल करणेबाबत उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय व परिपत्रक 1 व 2 अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. उपरोक्त संदर्भिय शासन पत्र क्र. 3 व 5 अन्वये संगणक प्रणालीवरती अतिक्रमणाच्या नोंदीबाबत करावयाच्या कार्यवाहीची कार्यपध्दती विशद करण्यात आलेली आहे.

अतिक्रमणे नियमानुकुल करण्याच्या पुढील कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

1. संगणक प्रणालीद्वारे अतिक्रमणधारकांच्या खालीलप्रमाणे List / Form तयार करुन दि. 26 जानेवारी, 2019 व त्या दरम्यान होणाऱ्या ग्राम सभेसमोर ठेवण्यात याव्यात.

   अ. **List A** - दिनांक 01.01.2011 पूर्वीची अतिक्रमणे ज्यांच्याबाबत सूचना व आक्षेप नाहीत, तसेच स्थळ पाहणी अहवालानुसार संगणक प्रणालीमध्ये भरलेल्या माहितीशी जी सुसंगत आहेत अशा अतिक्रमणधारकांची यादी.

   ब. **List B** - दि. 01.01.2011 पूर्वीची अतिक्रमणे जी स्थळ पाहणीकरिता प्रलंबित आहेत त्याची यादी.

   क. **List C** - दिनांक 01.01.2011 पूर्वीची अतिक्रमणे जो स्थळ पाहणी अहवालानुसार अतिक्रमणाची संगणक प्रणालीमधील माहितीशी सुसंगत नाहीत.

   ड. **List D** - दिनांक 01.01.2011 पूर्वीची अतिक्रमणे ज्यांच्या बाबतीत स्थळ पाहणी अहवालानुसार प्रत्यक्ष जागेवर मिळकत / अतिक्रमण आढळून आलेले नाही.

   इ. **List E** - दिनांक 01.01.2011 नंतरच्या अतिक्रमणधारकांची यादी.

   फ. **Form F** -ज्या ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात एकाही अतिक्रमणाची नोंद संगणक प्रणालीवर नाही

२. उपरोक्त List A ते E ग्रामसभेमध्ये ठेऊन त्यातील प्रत्येक अतिक्रमणधारकाच्या नोंदीबाबत ग्रामसभेने निर्णय घ्यावा.

३. List A मध्ये ज्या जागेवर अतिक्रमण नियमानुकूल करण्यास ग्रामसभेची मान्यता आहे, त्याची नोंद संगणक प्रणालीवर करावी. नोंद झाल्यानंतर शासकीय विभागनिहाय यादी संगणक प्रणालीद्वारे प्राप्त होईल. यापैकी गावठाणातील अतिक्रमणाची यादी महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम 1958 कलम 55 नुसार, अंतिम मान्यतेसाठी गट विकास अधिकारी यांचेमार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे पाठविण्यात यावी.

४. List A मध्ये ज्या अतिक्रमणधारकांचे अतिक्रमण नियमानुकूल करण्यास ग्रामसभा विरोध दर्शवेल किंवा त्यामध्ये काही बदल सुचवेल अशा नावांची यादी, तसेच List B ते List D ग्रामसभेच्या ठरावासह शक्ती प्रदत्त समितीकडे पाठविण्यात यावी.

५. List E पैकी जर काही अतिक्रमणे दि. 01.01.2011 पूर्वीचे असल्याची ग्रामसभेची खात्री झाल्यास सदर अतिक्रमण धारकांची यादी तयार करावी. अशी अतिक्रमणधारकांची यादी पुढील निर्णयास्तव शक्ती प्रदत्त समितीकडे पाठविण्यात यावी. सदर अतिक्रमणधारकांबाबत शक्ती प्रदत्त समितीच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.

६. मुद्दा क्र. ३ प्रमाणे List A मधील ज्या अतिक्रमणधारकांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता प्राप्त होईल, अशा अतिक्रमणधारकांची नोंद संगणक प्रणालीत घेण्यात यावी. तदनंतर संगणक प्रणालीमधून ज्या अतिक्रमणधारकांना अतिक्रमण नियमानुकूल शुल्क भरावे लागणार आहे त्यांचे चलन संगणक प्रणालीवर उपलब्ध होईल व जी अतिक्रमणे नि:शुल्क नियमानुकूल करावयाची आहेत त्याचे आदेश संगणक प्रणालीद्वारे तयार होतील.

७. अतिक्रमित जागा नियमानुकूल करताना प्राप्त झालेल्या नियमानुकूल शुल्काच्या रक्कमेपैकी 10 % रक्कम जमा करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर " **विशेष ग्रामीण गृहनिर्माण फंड** " या नावाने खाती उघडण्यात यावीत व त्यामध्ये सदर रक्कम जमा करण्यात यावी.

८. ज्या ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात Form F प्रमाणे एकही अतिक्रमणाची नोंद नाही त्या ग्रामपंचायतीने अशा प्रकारचा ठराव ग्रामसभेत घ्यावा. ज्या ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये अतिक्रमणे आहेत परंतू संगणक प्रणालीवर नोंद झालेली नाही, असे ग्रामसभेचे मत असल्यास त्या ठरावात नमूद अतिक्रमणाची शहानिशा करुन अतिक्रमण असल्यास सर्व प्रथम नमुना नं. 8 मध्ये नोंद घेण्यात यावी. सदर नवीन नोंदी करणेबाबतच्या पुढील कार्यवाहीसाठीचे आदेश यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

आपला,

(signature) २४/१/१९

संजय बनकर

उप सचिव, महाराष्ट्र शासन

issued by mail

प्रत:- 1. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, बेलापूर, नवी मुंबई

2. प्रोजेक्ट मॅनेजर सीएसपी, ई-गव्हर्नन्स इंडिया प्रा. लि.

२४/१/१९